मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई ४००००१, दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ www.rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नस्ती क्र. रामविसं./आस्था/प्र.क्र.२५/६३५/२०२६
दिनांक : ०३.०७.२०२६

## ई-निविदा सूचना क्र. १/२०२६-२७
## (बाह्यस्त्रोताद्वारे मनुष्यबळ सेवा पुरविणाऱ्या संस्थांकडून ई-निविदा मागविण्याबाबत)

राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१ यांचे अधीनस्थ असणाऱ्या कार्यालयांत **"जिल्हा मराठी भाषा विकास कक्ष"** या प्रकल्पासाठी बाह्यस्त्रोताद्वारे कुशल-अकुशल मनुष्यबळ सेवा तात्पुरत्या स्वरूपात १ वर्षासाठी घेण्याकरिता दोन लिफाफा पद्धतीने इच्छुक मनुष्यबळ पुरविणाऱ्या नोंदणीकृत व अनुभवी निविदाकाराकडून ई निविदा मागविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने तपशीलवार जाहिरात, ई-निविदा भरण्यासाठी अटी व शर्ती शासनाच्या https://gem.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**कामाचा तपशील**

| अ.क्र. | कामाचे वर्णन | कामाचा कालावधी | कामाची अंदाजित वार्षिक रक्कम | बयाना रक्कम १% |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१ यांच्या अधीनस्थ कार्यालयांत बाह्यस्त्रोताद्वारे कुशल-अकुशल मनुष्यबळ सेवा पुरविणेबाबत. | १ वर्ष | रु.४.०६ कोटी (GST वगळून) | रु. ४.०६ लक्ष |

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक,
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

**निविदेचे वेळापत्रक**

| **माहिती** | **तपशील** |
|---|---|
| ई निविदा प्रसिद्ध | दिनांक : ०३.०७.२०२६ |
| ई निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक : ०३.०७.२०२६ ते २०.०७.०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत. |
| ई निविदा पूर्व बैठक (संस्थेच्या कार्यालयात) | दिनांक : ०९.०७.२०२६ दुपारी २.०० वा |
| तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक, वेळ | दिनांक : २१.०७.२०२६ दुपारी १२.०० वाजता |
| वित्तिय लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ | संकेतस्थळावर कळविण्यात येईल. |

**टीप:** उपरोक्त दिनांक व वेळेमध्ये बदल होऊ शकतो. सर्व बदलाचा तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर संकेतस्थळावर नमूद केलेल्या सर्व तारखा व वेळ अंतिम असेल. तरी निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक,
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

# <u>आवश्यक मनुष्यबळाचा तपशील</u>

मनुष्यबळ सेवा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | कामानुरूप आवश्यक मनुष्यबळ सेवा | एकूण संख्या | मानधन प्रति महिना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी भाषा अधिकारी या पदाच्या कामासाठी | ३६ | रु.३५,०००/- | शासकीय नियमानुसार नमूद मानधनातून अनुषंगिक कपात करण्यात येईल. |
| २ | लिपिक टंकलेखक या पदाच्या कामासाठी | ७२ | रु.२१,०००/- | |
| ३ | शिपाई या पदाच्या कामासाठी | ३६ | रु.१७,०००/- | |

**निविदेचा कालावधी :**

निविदेचा कालावधी १ वर्षाचा राहील तसेच काम समाधानकाररित्या असल्यास शासनाच्या मान्यतेने कराराची मुदत २ वर्षे वाढविण्यात येईल.

**निविदा भरताना निविदाकारास येणाऱ्या खर्चाबाबत :**

निविदा सादर करताना येणाऱ्या सर्व खर्चाची संपूर्ण जबाबदारी ही निविदाकारावर असेल याबाबत निविदाकारास प्रतिपूर्ती हक्क सांगता येणार नाही तसेच सदरची निविदा प्रक्रिया रद्द झाल्यास अथवा निविदाकाराची निविदा नामंजूर केली गेल्यास सदरच्या निविदेकरिता झालेल्या खर्चाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. दि. १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार खरेदी नियम पुस्तिका ६.८ परिशिष्ट-८ बयाना रक्कम : १) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. २) शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांना तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग मंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकांकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील.

**निविदा प्रक्रिये बाबतचे स्पष्टीकरण :**

निविदा प्रक्रियेबाबत काही शंका किंवा तक्रारी असल्यास संबंधित निविदाकाराने अथवा निविदा भरू इच्छिणाऱ्या निविदाकारांनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा पूर्व बैठकीत अथवा त्यापूर्वी या कार्यालयाकडे लेखी अथवा ईमेल द्वारा सादर करावी तदनंतर सदरच्या कोणत्याही तक्रारी अथवा शंका विचारत घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**कार्यालयाचा पत्ता:** राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१

**ईमेल:** rmvs_mumbai@yahoo.com

**निविदे प्रक्रियेतील बदलाबाबत :**
१) सक्षम प्राधिकारी ह्यांना निविदेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास निविदेच्या अंतिम दिनांक व वेळेपूर्वी शुद्धिपत्रकांद्वारे बदल करू शकतात.

२) शुद्धिपत्रकाद्वारे निविदेमध्ये केलेले बदल हे ग्राह्य मानले जातील व सदरचे बदल हे निविदेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहतील.

३) प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकामुळे निविदा सादर करण्यासाठी कालावधी वाढवण्याचा हक्क सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल व ती माहिती भरू इच्छिणाऱ्यांना लागू होईल.

**निविदा सादर करण्याबाबत :**
ई-निविदा या विहित मुदतीत दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत लखोटा क्र. १ तांत्रिक लखोटा व लखोटा क्र.२ व्यापारी लखोटा आहे. तांत्रिक लखोट्यातील कागदपत्रांची पूर्तता न केल्या गेल्यास व्यापारी लखोटा उघडण्यात येणार नाही व अशा निविदाकाराची निविदा नामंजूर करण्यात येईल व ई-निविदा प्रक्रियेतून त्यांना बाद  करण्यात येईल.

**निविदा सादर करणे विषयी अंतिम तारीख :**
निविदाधारकांनी परिपूर्ण निविदा विहित कालावधीत संकेतस्थळावरून ऑनलाईन सादर करायची आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निविदा सादर करण्याचा कालावधी शुद्धीपत्रकाद्वारे वाढविला असल्यास अथवा बदल केलेल्या अटी व शर्ती वगळता पूर्वीच्या निविदेतील अटी व शर्ती त्याच लागू राहतील.

**निविदेचा वैधता कालावधी :**
निविदेचा वैधता कालावधी हा १८० दिवसाचा राहील.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदाकारांच्या तक्रारीबाबत :**
निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकांवर विहित नमुन्यात तक्रार करणाऱ्या तक्रारदारास रु.१,००,०००/- (रु. एक लाख) इतकी अनामत रक्कम या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. जर तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित तक्रारदाराची अनामत रक्कम परत करून आरोप सिद्ध झालेल्या निविदाकारास निविदा प्रक्रियेतून वगळण्यात येऊन त्याची बयाना/अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. जर तक्रारीत कोणतेही तथ्य न आढळल्यास तक्रारदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**निविदेचे मूल्यमापन :**
१. राज्य मराठी विकास संस्थेने गठीत केलेल्या समितीमार्फत तांत्रिक लखोट्यातील आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली जाईल.
२. निविदाधारक पात्रतेचे सर्व निकष, निविदाकाराची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याबाबतची क्षमता याबाबतची छाननी ही निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समितीद्वारे करण्यात येईल.

३. निविदाधारकांनी सादर केलेली निविदा परिपूर्ण असणे आवश्यक आहे. अपूर्ण कागदपत्रांच्या निविदा नामंजूर करण्यात येतील व सदरच्या निविदांचा व्यापारी लखोटा उघडण्यात येणार नाही.
४. ज्या निविदाधारकाचा लखोटा क्र.१ (तांत्रिक लखोटा) परिपूर्ण असेल त्याच निविदाधारकाचा लखोटा क्र.२ (व्यापारी लखोटा) उघडण्यात पात्र राहतील.
५. निविदाधारक आपल्या निविदेची स्थिती संकेतस्थळावर पाहू शकतात.

**निविदेच्या गोपनीयतेबाबत :**

निविदाकाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर सदर बाबतीत स्पष्टीकरण व दरांचा तुलनात्मक तक्ता, समितीच्या शिफारशी तसेच निविदा प्रक्रियेबाबतची कोणतीही माहिती निविदाधारकांस अथवा जे निविदा प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत अशा कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस देता येणार नाही अथवा याबाबत हक्क सांगता येणार नाही. तसेच निविदेच्या अनुषंगाने कोणतीही माहिती उघड करणे किंवा निविदा प्रक्रियेस अडचण निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करता येणार नाही.

**कुशल व अकुशल मनुष्यबळ सेवा पुरवठा करावयाच्या कामाचे स्वरूप व व्याप्ती :**

राज्य मराठी विकास संस्थेने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार सेवा देणे आवश्यक राहील तसेच संस्थाप्रमुखांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार काम करणे बंधनकारक असेल. सदर सेवेत कुचराई अथवा असमाधानकारक सेवा आढळल्यास दंड करण्यात येईल व त्याची वसुली ठेकेदाराच्या देयकातून वसूल केली जाईल.

**यशस्वी निविदाकाराने, उपलब्ध करून दिलेल्या व्यक्तींना खालील वस्तूंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील :**

१. प्रत्येकाला वैयक्तिक ओळखपत्र देणे.
२. शिपाई कामासाठी असलेल्या व्यक्तींना गणवेश देणे.

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक,
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

## बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १. | या कामाच्या निविदेची अंदाजे वार्षिक रक्कम रु.४.०६ कोटी (GST वगळून) |
| २. | ई-निविदा अर्जासोबत बयाना ठेव (EMD) रक्कम रु. ४.०६ लक्ष ऑनलाईंन अथवा बँक हमी (guarantee) स्वरूपात भरणे आवश्यक आहे.<br>खातेदाराचे नाव : Rajya Marathi Vikas Sanstha<br>बँकेचे नाव : Union Bank of India<br>बँक अकाऊंट नंबर : 520101011024980<br>बँक आय.एफ.एस.सी (IFSC) कोड :UBIN0905364 |
| ३. | यशस्वी निविदाकाराने मनुष्यबळ पुरविल्यानंतर त्या बाबतचा पारिश्रमिक/मोबदला हा मासिक तत्वावर (monthly basis) दोन प्रतीत सादर केल्यानंतर, ३० दिवसांच्या आत देण्यात येईल. तसेच पारिश्रमिक/मोबदला देण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला तर त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही. |
| ४. | दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून शासकीय नियमानुसार आयकर, GST संबधित व अन्य आवश्यक कर कपात करण्यात येतील. कर कपाती नियमानुसार संबंधित कार्यालयात जमा न केल्यास निवड करण्यात आलेला निविदाकार हा फौजदारी कार्यवाहीसाठी पात्र राहील. |
| ५. | संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या उमेदवारांचे मासिक पारिश्रमिक अनिवार्य वजाती (EPFO,ESIC, PT अंतर्गत वर्गणी) करून त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा प्रमाणपत्रासह (Bank Statement etc.) संचालक, राज्य मराठी विकास संस्था या कार्यालयास दरमहा दिनांक २० पूर्वी सादर करावा लागेल. तद्नंतरच संस्थेचे पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येईल. |
| ६. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २२.०२.२०१९ वित्त विभागाच्या दिनांक २७.०४.२०२२ या शासन निर्णयात नमूद तरतुदीनुसार शासनाने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे तसेच वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्ते अदा करणे संस्थेस बंधनकारक राहील. उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेल्या मानधनावर कायदेशीर दायित्व/कपाती उदा. इ.पी.एफ.ओ., इ.एस.आय.एस., प्रोफेशनल टॅक्स, कामगार वेल्फेअर फंड इत्यादीं बाबी कपात करून संबंधित प्राधिकरणांकडे जमा करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. |
| ७. | यशस्वी निविदाकाराला राज्य मराठी विकास संस्थेकडे निविदा रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत ठेव म्हणून राष्ट्रीयकृत/ शेड्युल बँकेची बँक गॅरेंटी सादर करावी लागेल. संबधित कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनाची हमी म्हणून सदर रक्कम जमा करणे आवश्यक आहे. त्यात कोणतीही सूट देण्यात येणार नाही. |
| ८. | बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा उपलब्ध करण्यासाठी निवड होणाऱ्या निविदाकारास राज्य मराठी विकास संस्थेशी करार करावा लागेल. पुरवठादारास सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांच्या सेवा पुरविण्यासंबंधिचा करार रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक राहील. |
| ९. | बाह्ययंत्रणेद्वारे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळांसंदर्भात करण्यात आलेल्या कराराचा कालावधी १ वर्षाचा राहील तसेच काम समाधानकारकरित्या असल्यास शासनाच्या मान्यतेने कराराची मुदत २ वर्षे वाढविण्यात येईल. संबंधित पुरवठादाराशी करण्यात आलेला करार चालू ठेवण्याचे / संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या स्वाधीन असतील. पुरवठादारास सदर करार संपुष्टात आणावयाचा असल्यास संस्थेस तीन महिन्यांची नोटीस देणे आवश्यक राहील. तसेच संस्थेद्वारे मुदत पूर्ण होण्याआधी करार/सेवा संपुष्टात आणावयाचा असल्यास पुरवठादारास तशी पूर्वसूचना / कोणतेही कारण न देता एक महिना अगोदर देऊन |

| | |
|---|---|
| | करार/सेवा संपुष्टात आणला जाईल. पुरवठादाराकडून करारातील अटी व शर्तींचे पालन समाधानकारकरित्या न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणणे/कराराची मुदतवाढ करणे/मुदत कमी करणे याबाबतचा अंतिम निर्णय संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांचा असेल. जर सदर करारास मुदतवाढ दिल्यास उमेदवाराचे मासिक मानधन जुन्या करारातील दरानेच देण्यात येतील. उपलब्ध करून दिलेल्या व्यक्तीला संस्थेने मान्य केलेल्या रजांव्यतिरिक्त अन्य (शासकीय) रजा लागू होणार नाहीत. तसेच उपलब्ध करून दिलेली व्यक्ती सलग १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास संबधित व्यक्तीची सेवा कमी करून त्या जागी दुसऱ्या व्यक्तीची सेवा पुरवावी लागेल. |
| १०. | पुरवठादाराकडून देण्यात आलेल्या उमेदवारास त्यांचे मासिक मानधन अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी पुरवठादाराची राहील. शासकीय संस्थेकडून देयक अदा करण्यास विलंब जरी झाला तरी उपलब्ध मनुष्यबळ सेवेसाठी दिलेल्या व्यक्तीला मानधन वेळेवर अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच संबंधित व्यक्ती कार्यालयात अनुपस्थित राहिल्यास देयकातील रकमेतून त्या कालावधीची रक्कम वजा करण्यात येईल. |
| ११. | पुरवठादारामार्फत पुरविण्यात येणारा उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. उमेदवारांची सचोटी / चारित्र्याबाबतचा पोलिसांचा दाखला पुरवठादाराने योग्य कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. तसेच कार्यालयीन कामकाजात उमेदवारांकडून कसूर/आर्थिक गैरव्यवहार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. उमेदवार वैद्यकीयदृष्ट्या कामकाज करण्यास सक्षम असावेत. |
| १२. | कायमस्वरूपी नोकरीसाठी उमेदवार/संबंधित व्यक्ती संस्थेकडे व शासनाकडे मागणी करणार नाही किंवा त्यासाठी न्यायालयाकडे दावा अथवा खटला भरणार नाही तसेच संघटना करणार नाही किंवा कोणत्याही संघटनेत सहभागी होणार नाही अशा आशयाचे उमेदवाराचे व पुरवठादाराचे हमीपत्र सेवेत हजर होताना पुरवठादाराने संस्थेस देणे आवश्यक राहील. |
| १३. | बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध होणाऱ्या मनुष्यबळाची सेवा पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांना भविष्यात या पदावर किंवा संस्थेच्या सेवेत नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच त्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर/संस्थेवर असणार नाही. |
| १४. | रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१, दिनांक १७.०८.२००२ मधील अ क्र ८ अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये किंवा निमशासकीय आणि स्वायत्त संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठा करण्याकरिता निविदा भरताना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून नोंदणीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केंद्रांना सूट देण्यात आली आहे. |
| १५. | प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार, जिल्हा मराठी भाषा विकास कक्ष निवड समितीकडे असतील. |
| १६. | निविदेसंबंधीचा पत्रव्यवहार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्याशी करण्यात यावा. |
| १७. | कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार व राज्य मराठी विकास संस्था यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास ते मुंबई स्थित न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च संबंधित पुरवठादाराचा असेल. |

| | |
|---|---|
| १८. | राज्य मराठी विकास संस्थेकडून यशस्वी निविदाकारास मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत पदांसाठी विहित केलेल्या अर्हते व पात्रतेनुसार उमेदवार उपलब्ध करून देणे पुरवठादारास बंधनकारक आहे. |
| १९. | पुरवठादाराद्वारे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाचे कामकाज समाधानकारक नाही, असे निदर्शनास आल्यास त्याऐवजी अन्य उमेदवार तात्काळ उपलब्ध करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. |
| २०. | पुरवठादाराद्वारे प्राप्त उमेदवारास कोणत्याही स्वरूपाची गंभीर इजा/ दुखापत झाल्यास उपचाराच्या खर्चाचे कोणतेही दायित्व राज्य मराठी विकास संस्थेचे / शासनाचे असणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. |
| २१. | शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक गोपनीयतेचा भंग होणार नाही याची जबाबदारी प्राप्त उमेदवार तसेच पुरवठादाराची असेल. अशा गोपनीयतेचा भंग झाल्यास पुरवठादार तसेच उमेदवार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे हक्क राज्य मराठी विकास संस्थेस असतील. |
| २२. | राज्य मराठी विकास संस्थेद्वारे निर्धारित केलेल्या कामकाजाच्या वेळेनुसार कामाचा कालावधी राहील. संबंधित उमेदवाराने त्याची कार्यालयात येण्याची व कार्यालय सोडण्याची वेळ याबाबत राज्य मराठी विकास संस्थेच्या नोंदणीशाखेत ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत नोंद करणे आवश्यक राहील. आवश्यकता असेल त्यावेळी जादा वेळ कार्यालयात थांबावे लागेल. तसेच वेळप्रसंगी कामाची निकड विचारात घेऊन सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहील. |
| २३. | संस्थेच्या कार्यालयीन मालमत्तेची काळजी / देखभाल संबंधित उमेदवाराने करणे आवश्यक राहील. तसेच मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची असेल. |
| २४. | संबंधित व्यक्तीने कर्तव्यावर असताना नशापान/धुम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करता कामा नये. तसे आढळून आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त केली जाईल. |
| २५. | पुरवठादाराकडून उपलब्ध करून दिलेले कर्मचारी राज्यात/परराज्यात आवश्यकतेनुसार बदली होऊन जाण्यास पात्र असतील. |
| २६. | बाह्ययंत्रणेद्वारे प्राप्त होणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे भत्ते लागू असणार नाही. तसेच जाण्या-येण्याचा खर्चही पुरविण्यात येणार नाही. तथापि संस्थेच्या आदेशानुसार कार्यालयीन कामाकरीता केलेल्या प्रवासासंबंधी संस्थेच्या मंजुरीने अनुज्ञेय असणारा प्रवास खर्च व भत्ता देण्यात येईल. |
| २७. | ई-निविदा भरताना संस्थेने जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या पदांसाठीच्या एकत्रित वेतनावरील एकूण रकमेच्या सेवाकराचा दर टक्केवारी मध्ये नमूद करणे आवश्यक राहील. तसेच नमूद दरावर जीएसटी कर अतिरिक्त देय राहील. निविदा भरताना पुरवठादारांनी नमूद केलेला दर सर्व पदांसाठी लागू राहील. |
| २८. | सदर ई-निविदा पूर्णपणे एकाच निविदाकारास अथवा विभागून एकापेक्षा जास्त निविदाकारास देण्याचे अधिकार जिल्हा मराठी भाषा विकास कक्ष निवड समितीकडे असतील. |
| २९. | एकदा निविदा भरल्यावर निविदाकाराला निविदेच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे समजण्यात येईल. |
| ३०. | निविदाकाराचा लाभांश हा भारत सरकार वित्त विभागाच्या दिनांक १७ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार असावा. |
| ३१. | मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने अन्य सेवापुरवठादार संस्थेशी उपकरार करता येणार नाही. |
| ३२. | निविदेची वैधता निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ६ महिने राहील. |

| | |
|---|---|
| ३३. | निवड झालेल्या पुरवठादाराने करार करण्यास नकार दिल्यास पुरवठादाराने भरलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| ३४. | निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी, सुरु असताना किंवा त्यानंतरच्या कालावधीत त्यात काही बदल करणे/ निविदेच्या अटी व शर्ती/तांत्रिक बाबींमध्ये बदल करावयाचे झाल्यास त्याबाबतची माहिती शुद्धीपत्रकाद्वारे प्रसिध्द करण्यात येईल. त्याचे अधिकार पूर्णतः जिल्हा मराठी भाषा विकास कक्ष निवड समितीकडे असतील. |
| ३५. | मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने उपलब्ध केलेल्या मनुष्यबळ सेवा देणाऱ्या व्यक्तींविरूद्ध कोणताही पोलीस रेकॉर्ड किंवा प्रलंबित फौजदारी खटले नसावेत. राज्य मराठी विकास संस्था, मुंबई मध्ये नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य आणि पार्श्वभूमी यांबाबत निवडलेल्या संस्थेने योग्य ती चौकशी करावी. तसेच, सेवेसाठी उपलब्ध केलेली व्यक्ती वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असल्याची खात्री संस्थेने करावी आणि मागणी केल्यास त्यांच्या वैद्यकीय तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| ३६. | निविदाकारांनी निविदा भरण्यासाठी त्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यास सदर निविदेचे कागदपत्र साक्षांकित करण्याची परवानगी दिली असल्यास त्या संदर्भात पुरवठादाराने तशा आशयाचे प्राधिकृत पत्र (authority letter) अपलोड करावे. |
| ३७. | राज्य मराठी विकास संस्थेच्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून निविदेत नमूद केलेले मनुष्यबळ कमी-जास्त करता येईल. |
| ३८. | राज्य मराठी विकास संस्थेच्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून निविदेतील नमूद मानधनात बदल करता येईल. |
| ३९. | राज्य मराठी विकास संस्थेच्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून निविदेत नमूद पदांच्या वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता तसेच इतर अटी शिथिल करता येईल. |
| ४०. | नमूद अटी व शर्तीमध्ये काही अटींचा समावेश करण्यात आला नसल्यास महाराष्ट्र शासनाने निविदेसाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी लागू राहतील. |
| ४१. | या निविदा प्रक्रियेत किंवा ठेका बहाल केल्यानंतर ठेका कालावधीत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत निर्णय घेण्यासाठी मा. सचिव, मराठी भाषा विभाग हे लवाद (Arbitrator) राहतील. |
| ४२. | यशस्वी निविदाकाराने मनुष्यबळ पुरवठा विहित मुदतीत न केल्यास प्रति दिवस रु. १०००/- इतका दंड आकारला जाईल. तसेच एखादा कर्मचारी १५ दिवसापेक्षा जास्त गैरहजर असेल त्याजागी बदली कर्मचारी देणे बंधनकारक राहील. |
| ४३. | यशस्वी पात्र निविदाकाराने या प्रकल्पासाठी मनुष्यबळ सेवा उपलब्ध करून देताना महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील उमेदवारांपर्यंत या संबंधातील जाहिरात पोहोचावी या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यातील सर्वाधिक खप असलेल्या किमान दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये या संबंधातील जाहिरात प्रसिद्ध करणे अनिवार्य असेल. |
| ४४. | **दिवाळखोरी आणि कर्तव्यात कसुरीसाठी दरकरार समाप्ती.**<br>स्वीकृत निविदाकार संस्था दिवाळखोर आढळल्यास, अशा संस्थेस सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई हे एक महिन्याची नोटीस देऊन कोणतीही नुकसान भरपाई न देता कार्यादेश/करार संपुष्टात आणतील.<br>खालीलप्रमाणे सेवा करार संपुष्टात आणण्यात येईल —<br>अ) मराठी भाषा विभागाने कार्यादेशाद्वारे दिलेल्या कालावधीत किंवा वाढीव कालावधीत स्विकृत निविदाकार संस्था सेवा देण्यास अयशस्वी ठरल्यास. |

| | |
|---|---|
| | ब) स्विकृत निविदाकार संस्था कार्यादेश व करारांतर्गत दिलेल्या अटी व शर्तीनुसार कोणत्याही जबाबदाऱ्या पार पाडण्यात अयशस्वी ठरल्यास. |
| ४५. | **अस्वीकृती**<br>४५.१ मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई व अधिनस्त कार्यालये येथील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नातेसंबंधातील जवळच्या नातेवाईकांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. या प्रयोजनासाठी जवळच्या नातेवाईकांची व्याख्या अशी करण्यात आली आहे.<br>अ) हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य<br>ब) त्यांचे पती किंवा पत्नी<br>क) वडील, आई, मुलगा, सून, मुलगी, जावई, भाऊ, बहीण यांच्याप्रमाणे संबंधित असलेले.<br>४५.२ ज्या कंत्राटदार/संस्थेचे यापूर्वी शासकीय/निमशासकीय /सहकारी संस्था यांना मनुष्यबळ सेवा पुरविण्यासाठी निवड केली होती व अशा कंत्राटदार/संस्थेविरोधात कोणतीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली होती व त्या तक्रारीत तथ्य असेल वा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल, अशा कंत्राटदाराला/संस्थेला या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. तसेच अशा कंत्राटदाराची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेला किंवा त्या कंत्राटदाराच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेला किंवा कंत्राटदार जर अन्य संस्थेत भागीदार असेल तर अशा संस्थेला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. |

**आवश्यक मनुष्यबळाचा तपशील व पात्रता**

बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या खालील विविध आवश्यक मनुष्यबळाच्या सेवेसाठी लागणारी शैक्षणिक अर्हता विहित करण्यात येत आहे.

**अ. जिल्हा मराठी भाषा अधिकारी या पदाच्या कामासाठी :-**

**अ) शैक्षणिक पात्रता :**

१) पदवी : सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदव्युत्तर पदवी किमान ५५% गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (मराठी विषयात पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य देण्यात येईल).

२) संगणक अर्हता : MS-CIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. मराठी युनिकोड प्रणालीचा वापर करणे व प्रगत टंकलेखनाचे (Advanced Typing) ज्ञान असणे अनिवार्य.

**ब) अनुभव:**

१) शासकीय, निमशासकीय कार्यालयातील किंवा सार्वजनिक अथवा खाजगी संस्थेतील अनुवाद, संपादन किंवा मराठी भाषा जतन व संवर्धन आणि प्रचार व प्रसार क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा.

२) मराठी शुद्धलेखन व शासकीय मसुदा लेखनाचे (Drafting) उत्तम ज्ञान.

**क) वयोमर्यादा:** किमान २५ वर्षे व कमाल ४५ वर्षे.

**ब. लिपिक-टंकलेखक या पदाच्या कामासाठी :-**

**अ) शैक्षणिक पात्रता:**

१) पदवी : कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे (मराठी विषयात पदवी असल्यास प्राधान्य देण्यात येईल).

**टंकलेखन:** मराठी टंकलेखन किमान ४० श.प्र.मि.आणि इंग्रजी ४० श.प्र.मि. (GCC-TBC प्रमाणपत्र आवश्यक).

**२) संगणक ज्ञान:** MS-CIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. मराठी युनिकोड, गुगल इनपुट टूल्स आणि MS-Office चे संपूर्ण ज्ञान.

**ब) अनुभव:** १) शासकीय, निमशासकीय कार्यालयातील किंवा सार्वजनिक अथवा खाजगी संस्थेतील लिपिक व मराठी टंकलेखन कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा.

२) किमान ४० श.प्र.मि.गतीने मराठी टंकलेखन कामाचा पुरेसा अनुभव असावा.

क) वयोमर्यादा :- किमान २१ वर्षे व कमाल ४० वर्षे.

<u>क. शिपाई (चपराशी) या पदाच्या कामासाठी :</u>

**अ) शैक्षणिक पात्रता:**

१) किमान १० वी उत्तीर्ण.

२) मराठी वाचता व लिहिता येणे आवश्यक आहे.

३) शासकीय, निमशासकीय कार्यालयातील किंवा सार्वजनिक अथवा खाजगी संस्थेतील कामाचा प्राथमिक अनुभव असल्यास प्राधान्य.

**ब) वयोमर्यादा:** किमान १८ वर्षे व कमाल ४० वर्षे.

**निविदा तांत्रिक लिफाफा : निविदाकाराने खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. निविदाकाराने खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर न केल्यास त्यास अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

०१) निविदा बयाना (EMD) रक्कम रु. ४.०६ लक्ष ऑनलाईन पद्धतीने/बँक ग्यारंटी स्वरूपात भरणे आवश्यक आहे.

०२) निविदाकार संस्था ही कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणी असलेली नोंदणीकृत संस्था, सहकारी संस्था किंवा नोंदणीकृत भागीदारी किंवा प्रोप्रायटरी असावी त्यासंबंधी नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र.

०३) निविदाधारकाची मागील ३ वर्षात प्रत्येक वर्षाची आर्थिक उलाढाल रु. २० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. (सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५). सदर उलाढाल सनदी लेखापाल यांचेकडून नमुना-क नुसार UDIN No. सह प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे.

०४) निविदाधारकाने मागील ३ वर्षाचे ताळेबंद अहवाल, नफा तोटा पत्रक सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणित करून सादर करणे आवश्यक आहे (सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५).

०५) निविदाधारकाचे सन २०२४-२५ वर्षात कमीत कमी रु. ५.०० कोटी नेटवर्थ (Networth) असणे आवश्यक आहे तसेच सदर प्रमाणपत्र सनदी लेखापाल यांचेकडून UDIN No. सह प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे.

०६) महाराष्ट्र राज्यातील संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

०७) दुकाने कायदा नोंदणी प्रमाणपत्र.

०८) वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र.

०९) निविदाधारकाने सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ सालचे GSTR-९, GSTR-९C वार्षिक रिटर्न्स सादर करणे आवश्यक राहील तसेच सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ सालचे वस्तू व सेवाकर भरणा आणि पूर्तता प्रमाणपत्र हे वस्तू व सेवाकर विभागाकडून सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल यांचेकडील ना परतावा (No Dues) प्रमाणपत्र किंवा प्रशंसा प्रमाणपत्र (GST Appriciation) ग्राह्य धरले जाणार नाही.

१०) निविदाधारकाने मागील ५ वर्षांपैकी कोणत्याही ३ वर्षात किंवा निविदा दिनांकापर्यंत महाराष्ट्र राज्यातील शासकीय/निमशासकीय संस्थेत एकाच आदेशात रु.१२ कोटी रक्कम, ३०० कुशल अकुशल मनुष्यबळ, १० वेगवेगळी ठिकाणे, १५ वेगवेगळ्या प्रकारची पदे, कमीत कमी ३ जिल्हे असे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र व कार्यादेश सादर करणे आवश्यक आहे.

११) आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन कार्ड).

१२) आयकर विवरणपत्र दाखल केल्याबद्दल ITR दस्तऐवज ( सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५).

१३) निविदाधारकाने व्यवसाय कर प्रमाणपत्र (PT) तसेच माहे एप्रिल २०२५ ते माहे मार्च २०२६ पर्यंतची व्यवसाय कर भरलेली चलने सादर करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ चे व्यवसायकर भरणा आणि पूर्तता (PT Clearance(No Dues)) प्रमाणपत्र हे तत्सम विभागाकडून आवश्यक. सनदी लेखापाल यांचेकडील ना परतावा (No Dues) प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

१४) ३०० कामगारांचे एक (Single) वैध लेबर लायन्सस. अर्ज केल्याची पावती ग्राह्य धरली जाणार नाही.

१५) कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) नोंदणी प्रमाणपत्र.

१६) ESIC ची प्रती माह ५०० कामगारांची माहे ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ पर्यंतची ESIC हप्ता जमा केलेली चलने तसेच ऑनलाईन कामागारांच्या नावाची प्रत (Contribution History) आवश्यक.

१७) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचेकडील प्रमाणपत्र तसेच जून-२०२५ व डिसेंबर २०२५ कालावधीतील भरलेली चलने आवश्यक.

१८) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी EPF नोंदणी प्रमाणपत्र.

१९) EPF ची प्रती माह ५०० कामगारांची माहे ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ पर्यंतची EPF हप्ता भरलेली चलने (Paid Challan) तसेच PF Generated Challan सादर करणे आवश्यक.

२०) निविदाधारकाने वैध आंतरराष्ट्रीय मानकीकरण संस्था (ISO) ९००१, १४००१ व ४५००१ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र निविदा प्रसिद्ध झालेल्या दिनांकाच्या ३ महिन्यापूर्वीचे असणे आवश्यक आहे.

२१) सदरील निविदेसाठी सहभागीदार (Joint Venture) ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**निविदा प्रक्रियेत सादर करण्यात आलेल्या दस्तावेजांचे तांत्रिक गुणांकन खालीलप्रमाणे राहील.**

तांत्रिक पात्रतेसाठी निविदाकारास ७० गुण मिळणे आवश्यक आहे. ७० पेक्षा कमी गुण मिळणारे निविदाकार अपात्र ठरविण्यात येतील.

| अ.क्र. | तपशील | गुण |
|---|---|---|
| **अ** | **निविदाकाराची सन २०२४-२५ ची वार्षिक उलाढाल (२५ गुण)** | |
| १ | २० कोटी ते २५ कोटी | १० |
| २ | २५ कोटी ते ३० कोटी | १५ |
| ३ | ३० कोटी पेक्षा जास्त | २५ |
| **ब** | **सन २०२४-२५ रोजीचा संस्थेचा नेटवर्थ (१० गुण)** | |
| १ | ५ कोटी ते ७ कोटी | ५ |
| २ | ७ कोटी ते १० कोटी | ८ |
| ३ | १० कोटी पेक्षा जास्त | १० |
| **क** | **मागील ५ वर्षांपैकी ३ वर्षातील किंवा निविदा दिनांकापर्यंत कुशल अकुशल मनुष्यबळ अनुभवाची रक्कम ( २५ गुण)** | |
| १ | १२ कोटी ते १४ कोटी | १० |
| २ | १४ कोटी ते १८ कोटी | २० |
| ३ | १८ कोटी पेक्षा जास्त | २५ |
| **ड** | **एका कार्यादेशात पुरविण्यात आलेली मनुष्यबळ संख्या ( २० गुण)** | |
| १ | २५० ते ३०० मनुष्यबळ | १० |
| २ | ३०० ते ५०० मनुष्यबळ | १५ |
| ३ | ५०० पेक्षा जास्त | २० |
| **इ** | **संस्थेने मार्च २०२६ रोजी PF भरलेल्या कामगारांची संख्या ( २० गुण)** | |
| १ | ५०० ते ७०० मनुष्यबळ | १० |
| २ | ७०० ते १००० मनुष्यबळ | १५ |
| ३ | १००० पेक्षा जास्त | २० |

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक,
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

**नमुना-अ**

**निविदा अर्ज**

(संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे)

प्रति,
मा. संचालक,
राज्य मराठी विकास संस्था,
मुंबई -४०० ००१.

विषय : कुशल व अकुशल मनुष्यबळ सेवा पुरवणे या कामाचा निविदा अर्ज सादर करणेबाबत.
संदर्भ :

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आम्ही सर्व आवश्यक ती कागदपत्रे तपासून निविदेसोबत सादर करीत आहोत. तांत्रिक लखोट्यात मागणी केल्याप्रमाणे आम्हांस निविदेतील सर्व नियम, अटी व शर्ती माहिती असून ते नियम,अटी शर्ती आम्हाला बंधनकारक असून त्या आम्हाला मान्य आहेत. निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचून आम्ही कंत्राटी कुशल/अकुशल मनुष्यबळ सेवा पुरवणे या कामाची निविदा सादर करीत आहोत.

जर आमची निविदा मंजूर झाली तर निविदेत स्पष्ट केल्याप्रमाणे कामाचे स्वरूप व व्याप्ती याप्रमाणे सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यास मी/ आम्ही बांधील राहू व सदर बाबतीत आमची कोणत्याही प्रकारची तक्रार असणार नाही.

जर आमची निविदा मंजूर करण्यात आली तर आम्हास निविदेतील नियमाप्रमाणे देय असलेली सुरक्षा ठेव (वार्षिक निविदा रक्कमेच्या ३% प्रमाणे) १५ दिवसात देणे आम्हास बंधनकारक आहे व सदर बाबतीत आमची कोणतीही तक्रार असणार नाही.

आम्हास निविदेच्या कालावधीमध्ये तसेच निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व नियम व अटीनुसार, कामाचे स्वरूप व व्याप्तीनुसार व दराप्रमाणे सेवा पुरवणे आम्हांस बंधनकारक राहील. जोपर्यंत अंतिम निविदा तयार होऊन ती कार्यान्वित होत नाही तोपर्यंत राज्य मराठी विकास संस्था सदरच्या प्रक्रियेस बांधील नाही तसेच आम्हांस माहिती आहे की सदरची निविदा प्रक्रिया अंतिम होत नाही तोपर्यंत राज्य मराठी विकास संस्था बांधील नसून तुम्ही कोणत्याही निविदा स्वीकारु अथवा नाकारु शकतात.

निविदाधारकाची सही व शिक्का
दिनांक :

**नमुना-ब**

**निविदा अटी स्वीकृती प्रमाणपत्र**

(संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे)

१. मी/आम्ही आपण नमूद केलेल्या शासकीय संकेतस्थळावरून (https://gem.gov.in) निविदा दस्तऐवज डाऊनलोड केले आहेत.

२. मी/आम्ही याद्वारे प्रमाणित करतो की, मी/आम्ही निविदा दस्तऐवजांमधील संपूर्ण अटी व शर्ती वाचल्या आहेत; या अटी व शर्ती कंत्राट कराराचा अविभाज्य भाग आहेत आणि मी/आम्ही त्यामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व अटी/शर्ती/कलमांचे पालन करू.

३. हे स्वीकृती पत्र सादर करताना, राज्य मराठी विकास संस्थेद्वारे वेळोवेळी पारित करण्यात आलेल्या शुद्धिपत्रांचा (Corrigendum) देखील आम्ही विचार केला आहे.

४. मी / आम्ही याद्वारे, वर नमूद केलेल्या निविदा दस्तऐवज / शुद्धिपत्रांमधील निविदा अटींचा संपूर्णपणे आणि बिनशर्त स्वीकार करतो.

५. या निविदेतील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास, आपल्या संस्थेला ही निविदा/बोली नाकारण्याचा, तसेच भरलेली संपूर्ण बयाना रक्कम (Earnest Money Deposit) पूर्णपणे जप्त करण्याचा अधिकार/स्वातंत्र्य असेल; आणि या अटीच्या पूर्ततेबाबत संस्थेविरुद्ध आमचा कोणताही दावा किंवा अधिकार असणार नाही.

निविदाधारकाची सही व शिक्का

दिनांक:

**नमुना-क**

**वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र**

(सी.ए. च्या लेटरहेडवर सादर करावे)

आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५

मे. ____________________यांचा मागील तीन वर्षांचा वार्षिक उलाढाल खालीलप्रमाणे दिला आहे; तसेच हे विवरण सत्य व अचूक असल्याचे प्रमाणित करण्यात येते.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | २०२२-२३ | रु. |
| २ | २०२३-२४ | रु. |
| ३ | २०२४-२५ | रु. |

स्वाक्षरी व शिक्का (सी.ए)

यूडीन क्र.

मेंबरशिप नंबर

दिनांक:

**नमुना- ड**

**अनुभवाचा तपशील**

| अ.क्र. | सेवा देत असलेल्या संस्थांचे नाव | कामाचे स्वरूप | कार्यादेश क्र. | अनुभव रक्कम | कामाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

निविदाधारकाची सही व शिक्का
दिनांक:

**नमुना-इ**

**व्यापारी लखोटा**

कामाचे नाव: राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१ यांचे अधिनस्त असणाऱ्या कार्यालयांत बाह्यस्त्रोताद्वारे कुशल-अकुशल मनुष्यबळ सेवा १ वर्षाकरिता पुरविणेबाबत

| अ.क्र. | कामानुरूप आवश्यक मनुष्यबळ सेवा | एकूण व्यक्तींची संख्या | मानधन प्रति महिना रु. | निविदाधारकाचा सेवा शुल्क टक्केवारी मध्ये (एकूण मानधनाच्या रक्कमेवर) |
|---|---|---|---|---|
| अ | ब | क | ड | इ |
| १ | मराठी भाषा अधिकारी या पदाच्या कामासाठी | ३६ | ३५,०००/- | ..........% |
| २ | लिपिक टंकलेखक या पदाच्या कामासाठी | ७२ | २१,०००/- | |
| ३ | शिपाई या पदाच्या कामासाठी | ३६ | १७,०००/- | |

टीप:

१. सर्वात कमी दर (L-१) हा " इ " स्तंभातील मूल्यावर, म्हणजेच 'सेवाशुल्कावर (Service Charge) आधारित मानला जाईल. सेवा शुल्क हे निविदाकाराने टक्केवारीच्या स्वरूपात नमूद करणे अनिवार्य आहे. निविदाकाराने टक्केवारीमध्ये नमूद केलेले हे सेवा शुल्क सर्व पदांसाठी समान राहील.

२. निविदाकाराने सादर केलेला टक्केवारीतील सेवाशुल्क हा GST वगळून असेल.

३. सेवा शुल्क दशांश चिन्हापुढील दोन अंकांपर्यंत (Upto २ Decimal) ग्राह्य धरला जाईल.

४. निविदाकाराचा लाभांश हा भारत सरकार वित्त विभागाच्या दिनांक १७ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार असावा.

निविदाधारकाची सही व शिक्का

दिनांक: